# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 12/12/2022 (रविवार) सायंकाळ

---

## घरफोडी

**पो.स्टे. मौदा** :- अंतर्गत १२ कि.मी. अंतरावरील तारसा येथे दिनांक १०/१२/२०२२ चे सकाळी ०६.०० ते दिनांक ११/ १२/ २०२२ चे १६.०१ वा. दरम्यान यातील अज्ञात आरोपीने फिर्यादी नामे- प्रमोद महादेव चौधरी, वय ४९ वर्ष, रा. तारसा, ता. मौदा जि. नागपुर यांचे घराचे मागील खिडकी मधून हात टाकून दरवाजाची कडी बाजूला करून आलमारी मध्ये ठेवलेले नगदी १०००/-रू. दहा ग्रॅम सोने किंमती अंदाजे १००००/-रू. व वडीलोपार्जित सात जोड चांदीच्या पायपट्ट्या असा एकूण २२ हजार रुपयाचा मुद्देमाल तसेच फिर्यादीचे घराशेजारी राहणारे नामे- मनोहर भैय्याजी भुजाडे, रा. तारसा यांचे घराचे समोरील दरवाजाचे कुलूप तोडून त्यांच्या घराचे आत प्रवेश करून नगदी वीस हजार रुपये चांदीचे वडिलोपार्जित शिक्के व दोन पायपट्ट्या असा एकूण २४ हजार रुपयाचा मुद्देमाल दोन्ही मिळून नगदी, सोने, चांदी दागिने मिळून असा एकुण ४६,५००/- रुपयाचा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरून पोलीस स्टेशन मौदा येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ४५७,३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. अज्ञात आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि जगदीश बिरोले मो. नं. ९५५२५१३५९५ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर